# —: प्रेस नोट:—

## श्री संदीप सब्बनवार, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत व्याहाड(बुज), जि. चंद्रपूर यांचेविरूध्द ३,५००/— रुपये लाचरक्कम स्विकाल्यावरून गुन्हा दाखल.

तक्रारदार हे ग्रामपंचायत व्याहाड (बुज), जि. चंद्रपूर येथील रहीवासी असून ठेकेदारीचे काम करतात. व्याहाड(बुज), जि. चंद्रपूर येथील ग्रामपंचायत भवन बांधकाम जनसुविधा योजना सन २०१७—१८ अंतर्गत मूळ ठेकेदाराचेवतीने तक्रारदार यांनी काम सुरू केलेले असून सदरचे काम स्लॅब पर्यंत झालेले आहे. झालेल्या कामाचे मोजमाप करून मोजमाप पुस्तीके प्रमाणे (एमबी) तयार करून ग्रामपंचायत व्याहाड (बुज) येथे सादर करून त्याचे एकुण ३,८४,०००/— रू. चे बील मूळ ठेकेदार यांना प्राप्त झाले आहे. ग्रामपंचायत भवनाचे बांधकाम तक्रारदार हे करीत असल्याने मौजा व्याहाड(बुज), जि. चंद्रपूर येथील ग्रामविकास अधिकारी संदीप सब्बनवार यांनी तक्रारदारास मिळालेले बील काढून दिल्याचा मोबदला म्हणून व पूढील बांधकामाचे बिल काढून देण्यास अडथळा निर्माण न करण्याकरीता ४०००/— रू. लाचेची मागणी केली. तक्रारदारास संदीप सब्बनवार यांनी मागणी केलेली लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे तक्रार नोंदविली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर तर्फे आज दि. ४/१२/२०१८ रोजी सापळा कार्यवाही आयोजीत केली असता सापळा कार्यवाही दरम्यान श्री संदीप सब्बनवार, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत व्याहाड (बुज), जि. चंद्रपूर यांनी तक्रारदारास ४०००/— रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३५००/— रू. लाचरक्कम स्विकारली. यावरून आरोपी विरूध्द पो. स्टे. सावली जि. चंद्रपूर येथे लाचलुचपत प्रतिबंध कायदा १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येत आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयाशी संपर्क साधावा.

SP ACB NAGPUR 7040222221
LANDLINE NO 0712/2561520
TOLL NO 1064
Website: www.acbmaharashtra.gov.in
Mobile app: www.acbmaharashtra.net
Facebook page: www.facebook.com/MaharashtraACB
Whatsapp: 9930997700

D.C.P./S.P. Anti Corruption Bureau ★Nagpur★

(विजय माहुलकर)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर